

# महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

१०५, उच्च न्यायालय (पीडब्ल्यूडी) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ - वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in - ई-मेल : mslsa-bhc@nic.in - फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६९१३५८ - फॅक्स : (०२२) २२६७४२९५

# NATIONAL LOK ADALAT
# राष्ट्रीय लोकअदालत

**११ फेब्रुवारी २०१७**

## भांडणापेक्षा समझोता बरा, मिळेल त्यातच आनंद खरा

दुरावलेले संबंध व प्रलंबित असलेली प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता महाराष्ट्रातील उच्च न्यायालये व खंडपीठे, सर्व जिल्हा न्यायालये, तालुका न्यायालये, कौटुंबिक न्यायालये, ग्राहक न्यायालय, इतर सर्व न्यायालये व न्यायाधिकरणे येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली (National Legal Services Authority) यांच्या आदेशान्वये **दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी "राष्ट्रीय लोकअदालत"** आयोजित करण्यात येत आहे.

तरी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आवाहन करण्यात येते की, न्यायालयात दाखल झालेली प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवण्याकरीता संबंधितांनी आपली प्रकरणे ज्या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणाबाबत नजीकच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावा व दि. ११ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत.

### खालील प्रकारची प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवता येतात.

१. दिवाणी व फौजदारी (तडजोडपात्र गुन्हे)
२. भुसंपादन नुकसान भरपाईची प्रकरणे
३. बँका व अन्य वित्तीय संस्थांचे नुकसान व वसुली प्रकरण
४. वैवाहिक संबंधातील वाद
५. मोटार अपघात नुकसान भरपाईची प्रकरणे
६. निगोशिएबल इन्स्टुमेन्टस् ॲक्ट च्या क-१३८ खाली दाखल झालेली प्रकरणे
७. महसूल बाबतची प्रकरणे
८. कामगार वाद, वन कायदा व इतर सर्व तडजोडपात्र प्रकरणे

**सामंजस्याने वाद मिटविणं यातच खरं शहाणपण, त्यासाठी तुम्हाला मदत करेल महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण**

### ठळक वैशीष्ट्ये :

- न्यायाधिश, तज्ज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे मंडळ आपणास मदत करेल.
- कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही.
- लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपिल नाही.
- कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते.
- खटल्यांमध्ये साक्षी-पूरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
- लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

**आत्तापर्यंत महाराष्ट्रात २७ लाखांपेक्षा जास्त प्रकरणे महालोकअदालत / राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढण्यात आली आहेत.**

**मग वाट कसली पाहताय? चालून आलेल्या संधीचा त्वरीत लाभ घ्या आणि परस्परातील वादांना पूर्णविराम द्या.**

## संपर्क

उच्च न्यायालय विधी सेवा समिती : मुंबई : ०२२-२२६३०७१४ / नागपूर : ०७१२-२५५५५५५ / औरंगाबाद : ०२४०-२४७३७३३

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ०२४१-२३५४९६५ | धुळे | ०२५६२-२३७४३६ | नागपूर | ०७१२ - २५४१०६२ | रत्नागिरी | ०२३५२-२२४७६८ |
| अकोला | ०७२४-२४१०१४५ | गडचिरोली | ०७१३२-२२३०४४ | नांदेड | ०२४६२ - २४६६६७ | सांगली | ०२३३-२३२६५११ |
| अमरावती | ०७२१-२६६७१७५ | जळगांव | ०२५७-२२२१४७४ | नंदूरबार | ०२५६४ - २१०७१० | सातारा | ०२१६२-२३६४९४ |
| औरंगाबाद | ०२४०-२३६३७७८ | जालना | ०२४८२-२२३६२५ | नाशिक | ०२५३ - २३१४३०६ | सोलापूर | ०२१७-२६२०२९२ |
| बीड | ०२४४२-२२८७६४ | कोल्हापूर | ०२३१-२५४१२९५ | उस्मानाबाद | ०२४७२ - २२५४२४ | सिंधुदूर्ग | ०२३६२-२२८४१४ |
| भंडारा | ०७१८४- २५६४६६ | लातूर | ०२३८२-२५१६६० | परभणी | ०२४५२ - २२९७४० | ठाणे | ०२२-२५४७६४४१ |
| बुलढाणा | ०७२६२-२४४६७३ | मुंबई | ०२२-२६४०२१७५ | पुणे | ०२० - २५५३४८८१ | वर्धा | ०७१५२-२४५५९४ |
| चंद्रपूर | ०७१७२-२७१६७९ | गोंदिया | ०७१८२-२३८२३४ | रायगड | ०२१४१ - २२३०१० | यवतमाळ | ०७२३२-२३९७४१ |